| CNR NO: MHAM170006082023 | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २९९/२०२३ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :- | १८.०७.२०२३ | | |
| | नोंदणी तारीख | :- | १८.०७.२०२३ | | |
| | निकाल तारीख | :- | ०६.०६.२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०२ | १० | १९ |
| | निशानी क्रमांक | :- | ५ च्या पुढे | | |

फॉर्म क्रमांक ३२

भाग अ

न्यायनिर्णय

[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (I)]

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिवसा, ता. तिवसा,**

**जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी रोहिणी वि. मनोरे)**

**न्यायनिर्णय**

**( पारीत दिनांक ०६.०६.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २९९/२०२३**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो. स्टे. तिवसा विरूध्द देवेंद्र शंकरराव सोनटक्के**

**अपराध क्रमांक १६९/२०२३**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, पो. स्टे. तिवसा, ता. तिवसा, जिल्हा – अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **कु. एल. टी. गेडाम**, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **देवेंद्र शंकरराव सोनटक्के,**<br>वय – ५८ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – धामंत्री,<br>ता. तिवसा, जि. अमरावती. |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधीज्ञ श्री. ए. पी. लांडे.** |

## भाग ब
## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १७.०५.२०२३ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १७.०५.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १८.०७.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १३.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | **०६.०६.२०२६** |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नांव | सुचनापत्र दिल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | देवेंद्र शंकरराव सोनटक्के | १७.०५. २०२३ | २४.०७. २०२५ | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ड) | आरोपीची निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

**न्यायनिर्णय**
**(पारीत दिनांक ०६.०६.२०२६)**

सदरचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ड) नुसार चालविण्यात आला.

२. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान वकील यांनी केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी हा १० लिटर गावठी हातभट्टी ची दारु किंमत रुपये १,०००/- चा मुद्देमाल विना परवाना व अवैधरीत्या विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगतांना आढळुन आला व त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ड) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

३. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्रमांक १ विजय (नि.क्र.५) याची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर निशाणी क्रमांक १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीविरुध्द कुठलाही पुरावा अभिलेखावर दाखल नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निदेवन नोंदविण्यात आले नाही. दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद ऐकला.

४. अभियोग साक्षीदार क्रमांक १ विजय (नि.क्र.५) याने त्याच्या पुराव्यादरम्यान तो आरोपीला ओळखत असल्याचे त्याने सांगीतले. दिनांक १७.०५.२०२३ रोजी पोलीसांनी त्याला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकरीता कोठेही बोलविले नसल्याचे त्याने सांगीतले. तसेच पोलीसांनी त्याच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला नसल्याचे त्याने सांगीतले. त्याचप्रमाणे त्याची घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे त्याने सांगीतले परंतु त्यातील मजकुर त्याला माहीत नसल्याचे त्याने पुराव्यादरम्यान सांगीतले. अभियोग पक्षाला सदर साक्षीदार मदत करत नसल्याकारणाने भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १५४ नुसार

उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाचे सर्व उत्तर सुचक प्रश्न नाकारले. त्यामुळे या पंच साक्षीदाराकडुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा संशयापलीकडे सिध्द होत नाही. अभियोग पक्ष वरील पंच साक्षीदाराकडुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करुन घेण्यास अपयशी ठरले.

५. वरील पंच साक्षीदाराच्या साक्षपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर पंच साक्षीदारासमक्ष कोणत्याही प्रकारचा पंचनामा केला नाही. पंच साक्षीदाराच्या सरतपासामध्ये पोलीसांनी त्याच्यासमक्ष कुठल्याही प्रकारची जप्तीची कार्यवाही केली नसल्याचे सांगीतले आहे. यावरुन असे दिसुन येते की, पोलीसांनी सदर पंचनामा स्वतंत्र पंच साक्षीदारासमक्ष तयार केले नाही. त्यामुळे सदर संशयाचा फायदा आरोपीस देणे न्यायनिर्देशीत आहे.

६. अभियोग पक्षाने द्रव्याबाबतचे रासायनिक परिक्षण अहवाल (नि.क्र.७) दाखल करण्यात आला आहे. परंतु सदर नमुना रासायनिक परीक्षणाकरीता पाठविल्यानंतर प्रयोगशाळेमध्ये प्राप्त झाल्यासंबंधीचा कुठलाही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल करुन सिध्द केला नाही. त्यामुळे सदर द्रव्य हे आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले होते आणि तेच द्रव्य रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते व त्याचेमध्ये कोणतीही फेरफार न होता तत्परतेने पाठविण्यात आले होते, ही बाब सिध्द होत नाही. तसेच रासायनिक

परीक्षणाकरीता कोणाच्या मार्फत व कोणत्या माध्यमाने जप्त केलेला नमुना पाठविण्यात आला होता या बाबी सुध्दा अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आल्या नाहीत. त्यासाठी अभियोग पक्षाने कुठलाही साक्षीदार तपासला नाही. त्यामुळे केवळ रासायनिक अहवालावर विसंबुन राहुन आरोपीस दोषी ठरविणे न्यायसंगत होणार नाही.

७. अभिलेखावर असलेल्या पुराव्याच्या आधारे असे निष्पन्न होते की, पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी ही पुर्णपणे अभियोग पक्षावर असते. अभियोग पक्ष हा घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरला आहे. फिर्यादी तसेच इतर साक्षीदारांना वारंवार संधी देवून सुध्दा तपासले नाही. आरोपीविरुध्दची फिर्याद ही सिध्द होऊ शकली नाही. या कारणास्तव अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ड) नुसारचा गुन्हा सिध्द झाला नाही. **म्हणुन, सदर न्यायालय मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u> –**

८. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय, पुरेसा व शंकेच्या पलीकडचा पुरावा सादर केला नाही. अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा

संशयापलीकडे सिध्द करु शकले नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. जप्त मुद्देमाल जागीच नाश केल्यामुळे त्याच्या विल्हेवाटीबाबत कोणताही आदेश पारीत नाही. **सदर न्यायालय मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

**१.** आरोपी नामे **देवेंद्र शंकरराव सोनटक्के,** वय – ५८, व्यवसाय – मजुरी, रा. धामंत्री, ता. तिवसा, जि. अमरावती याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ड) अन्वयेच्या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येते.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी रुपये १५०००/– (अक्षरी पंधरा हजार फक्त) चा वैयक्तीक जातमुचलका दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).**

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०६.०६.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

सं. फौ. ख. क्र. २९९/२०२३
शासन वि. देवेंद्र शंकरराव सोनटक्के
न्यायनिर्णय (नि.क्र.५ च्या पुढे)

## भाग क
## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]
## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग :–**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | विजय सुधाकरराव कोंडे (नि.क्र.५) | घटनास्थळ व जप्ती पंच |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

सं. फौ. ख. क्र. २९९/२०२३
शासन वि. देवेंद्र शंकरराव सोनटक्के
न्यायनिर्णय (नि.क्र.५ च्या पुढे)

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. बचाव :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.७ | रासायनिक परिक्षण अहवाल |

**ड. मुद्देमाल :–**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

स्वा/–
**(रोहिणी वि. मनोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तिवसा,
ता. तिवसा, जि. अमरावती.

दिनांक : **०६.०६.२०२६.**
स्थळ : **तिवसा**

## ***CERTIFICATE***

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Vijay K. Kaware** |
| Name of Court | : | Civil and Criminal Court, Teosa |
| Judgment dictated on | : | 06.06.2026 |
| Transcript ready on | : | 06.06.2026 |
| Judgment Signed by Presiding Officer on | : | 06.06.2026 |
| Judgment uploaded on | : | 06.06.2026 |